'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित**

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)**

**२०२५-२६**

**बी. ए. भाग – १ (सत्र -२)**

**गृहपाठ (Home Assignment)**

**मराठी विभाग**

---

**सूचना**

दिनांक : २९/०१/२०२६

बी. ए. भाग – १ मराठी **(साहित्यरंग)** विषयाच्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनीना सूचित करण्यात येते की, **द्वितीय सत्रातील** गृहपाठ खाली दिलेल्या प्रश्नांच्या आधारे स्वतःच्या आखीव कागदावर लिहून दिनांक **१६ फेब्रुवारी, २०२६** पर्यंत रूम नं. ३०७, मराठी विभागमध्ये जमा करावयाचे आहेत.

**गृहपाठासाठीचे प्रश्न (कोणताही एक प्रश्न सोडवा)**

१.' मृगजळ' या कवितेतून कवयित्री इंदिरा संत यांनी प्रेमाची निराशा कशी व्यक्त केली आहे, ते स्पष्ट करा.

२. 'प्रिय आईस' या कवितेतून कवयित्री नीरजा यांनी स्त्री दु: खाचे चित्रण कसे केले आहे, ते तुमच्या शब्दात मांडा.

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर**

**विभागप्रमुख**

मराठी विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

# गृहपाठ :1



नाव: कु. ऋतुजा संभाजी गोसावी.
रोल नं: 4066
विषय: मराठी
इयत्ता: B.A-FY(sem-II)

9/10

प्र.1. 'मृगजळ' या कवितेतून कवयित्री इंदिरा संत यांनी प्रेमाची निराशा कशी व्यक्त केली आहे, ते स्पष्ट करा.

→ प्रस्तावना:

मृगजळ ही इंदिरा संत याची एक सुंदर आणि अर्थपूर्ण कविता आहे. जीवनातील भ्रम निदर्शनास येतो. त्याचबरोबर वास्तवाचे चित्रण उत्तमपणे केले आहे. ज्यादरम्यान मृगजळ हे एक भ्रम आहे, जे आपल्याला आकर्षित करते, पण ते वास्तव नाही कवितेत वापरलेल्या प्रतिमांनी आणि प्रतिकांनी कवितेला अधिक अर्थपूर्ण बनवले आहे. कवयित्रीने आपल्या भावना आणि अनुभवांचे वर्णन केले आहे. ज्यामुळे वाचकाला जीवनाच्या अर्थाचा शोध घेण्यास प्रेरित करते.

कवयित्री परिचय:-

इंदिरा संत यांचा जन्म इंडी, ता.विजापूर येथे झाला. घरच्या घरी चौथी पर्यंतचे शिक्षण घेतले. तर बेळगावमध्ये पुढचे शिक्षण झाले. फर्ग्युसन महाविद्यालयात पुढील शिक्षण पूर्ण केले. तेथेच त्यांचा ना. मा. संत यांच्याशी परिचय झाला अन् कालांतराने ना. मा. संत याच्याशी विवाह केला. पतीच्या निधनानंतर तवंदी येथे साहित्य लेखनास सुरुवात केली. त्यांचे 'सहवास', 'शेला,' 'मेंदी,' मृगजळ', 'गर्भरेशीम', 'रंगबावरी' इत्यादी कवितासंग्रह आहेत. त्यांना 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहासाठी साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, 'मृगजळ' या कवितेसाठी महाराष्ट्र शासन पुरस्कार मिळाला. त्यांच्या कवितांत निसर्ग, स्त्रीमन, विरह, एकाकीपणा आणि नातेसंबंधांचे सूक्ष्म चित्रण दिसते. त्यांचे निधन 13 जुलै 2000 रोजी पुण्यात झाले.

कवितेचा आशय:-

'मृगजळ' या कवितेत इंदिरा संतांनी प्रेमाची निराशा व्यक्त केली आहे. प्रेम मृगजळासारखे हातातून निसटून जाते. त्यांची

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

GoodLuck Page No.
Date

तीव्र जाणीव त्यांनी या कवितेतून व्यक्त केली आहे. कवियत्री दारापाशी उभी आहे, पण दार बंद आहे तरी ती अधीर पावलाने चपलांच्या बंधातून निसटू बघते, म्हणजेच ती स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगत आहे. क्षणभरात विजेच्या बटणावरती बोट थरथरते आणि लाल विजेची नंद पाखरे अंगाअंगातून उठतात म्हणजे कवयित्रीला भावनांचा उद्रेक होत आहे. मन द्विधा अवस्थेत आहे, असे दिसून येते. मनातील विचाराच्या वादळांमुळे ती असह्य होऊन हात चौकटीवर टेकते आणि आतील वादळांमुळे आतील चाहूल रोकते, ज्यामुळे तिचे डोळे खिळतात. म्हणजेच ती अंतर्मुख होते. कवयित्री दरवाज्यातील उंबरठ्यावर उभी राहते अन् दाराआतील डोळ्यावर लक्ष देते म्हणजेच (हृदयाच्या) हृदयरूपी दाराच्या उंबरठ्यावर उभे राहून अंतर मनातील अव्यक्त भावनांचा अनुभव घेते. कवितेमध्ये याच अर्थपूर्ण आशयास दरवाजाच्या बंद फळ्या असा अलंकारिक वाक्यप्रयोग वापरला आहे. दरम्यान अव्यक्त भावना म्हणजेच बंदी वासाची जाणीव करून घेते.

मोर पिसाऱ्यासारखे झगमगणारे क्षण डोळ्यासमोर येतात, पण ते क्षणभरच टिकतात. जिथे सर्व वाटा संपतात आणि अनोळखी वळणे सुरू होतात. अशा गोंधळाच्या ठिकाणी कवियत्री स्वतःला हरवलेली आणि दिशाहीन अनुभवते. उन्हात चमकणाऱ्या काचेच्या बरणी सारखे तिचे आयुष्य केवळ मृगजळ ठरते. अनोळखी अशा ठिकाणी असंख्य वाटा आणि डोळे पाहते, म्हणजे ती जीवनाच्या अनिश्चिततेचा अनुभव घेते. भास समान जगात तिचे मन उलट-सुलट तडफडते आणि 'इथे कशी मी....इथे कशी मी' या प्रश्नातून तिची हतबलता आणि अस्तित्वाचा संघर्ष स्पष्ट होतो. कवितेचा शेवट अतिशय विचार प्रवर्तक आहे. "काचेच्या बरणीत उन्हाच्या" या प्रतिमेतून कवयित्रीने जीवनाचे सत्य मांडले आहे. कवयित्रीने प्रतिक्षा, उत्कंठा, अस्वस्थता आणि भास, क्षणभंगुरता आणि गोंधळ तसेच तडफड आणि वास्तव यांचे वर्णन वेगवेगळ्या प्रतिमांद्वारे उत्तमरित्या केले आहे. आयुष्य अनेकदा केवळ भासांच्या मागे धावण्यात खर्च होते. शेवटी उरणारी मनाची तडफड आणि वैफल्य यातून ही कविता वाचकांच्या मनावर एक खोलवर परिणाम सोडून जाते. ही कविता केवळ एका स्त्री ची व्यथा आणि तिच्या मानवी जीवनातील चिरंतन, संघर्षाचे प्रतिबिंब आहे. 'मृगजळ' मधील कविता केवळ वैयक्तिक दुःखाची मांडणी नसून ती सर्वसामान्य स्त्रीच्या भावविश्वासाचा आरसा आहे.

Goodluck

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

GoodLuck Page No.
Date

**समारोप :**

'मृगजळ' या कवितेत इंदिरा संत यांनी स्त्री मनातील अतृप्त ओढ, प्रेमाची निराशा, भास आणि वास्तव यांतील धूसर रेषा यांचे अत्यंत तरल शब्दांत वर्णन केले आहे. प्रेम कसे मृगजळासारखे हातातून निसटून जाते, याची तीव्र जाणीव होत असताना निर्णयाच्या क्षणात अडकलेले स्त्रीमन, आत्मशोधाची भीती, भावनिक अस्वस्थता आणि व्याकुळता इत्यादी बाबी मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

नाव - शिवानी बळवंत माने
इयत्ता - BA-FY
ह क्र - 4061
विषय - मराठी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

09/10

• 'मृगजळ' या कवितेतून कवियत्री इंदिरा संत यांनी प्रेमाची निराशा कशी व्यक्त केली आहे स्पष्ट करा.

→ प्रस्तावना:

मृगजळ ही इंदिरा संत यांची एक सुंदर आणि अर्थपूर्ण कविता आहे जीवनातील भ्रम निदर्शनास येतो. त्याचबरोबर वास्तवाचे चित्रण उत्तमपणे केले आहे. ज्यादरम्यान मृगजळ हे एक भ्रम आहे, जे आपल्याला आकर्षित करते, पण ते (वास्तव) वास्तव नाही कवितेत वापरलेल्या प्रतिमांनी आणि प्रतिकांनी कवितेला अधिक अर्थपूर्ण बनवले आहे. कवयित्रीने आपल्या भावना आणि अनुभवांचे वर्णन केले आहे. ज्यामुळे वाचकाला जीवनाच्या अर्थाचा शोध घेण्यास प्रेरित करते.

कवयित्री परिचय-

इंदिरा संत यांचा जन्म इंडी, ता विजापूर येथे झाला. घरच्या-घरी चौथी पर्यंतचे शिक्षण घेतले. तर बेळगावमध्ये पुढचे शिक्षण झाले फर्ग्युसन महाविद्यालयात पुढील शिक्षण पूर्ण केले तेथेच त्यांचा ना.मा संत यांच्याशी परिचय झाला मग कालांतराने ना.मा संत यांच्याशी विवाह केला. पतीच्या निधनानंतर त्यांनी येथे साहित्य लेखनास सुरुवात केली त्यांचे 'सहवास', 'शेला', 'मेंदी', मृगजळ', 'गर्भरेशीम', 'रंग बावरे', इ. कवितासंग्रह आणि 'श्यामली', 'कदली', 'चैतू' हे कथासंग्रह प्रकाशित आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)



कवितेचा आशय -

'मृगजळ' या कवितेत इंदिरा संतांनी प्रेमाची निराशा व्यक्त केली आहे. प्रेम मृगजळासारखे हातातून निसटून जाते, याची तीव्र जाणीव त्यांनी या कवितेतून व्यक्त केली आहे. कवियत्री दारापाशी उभी आहे, पण दार बंद आहे. तरी ती अधीर पावलाने चपलांच्या बंधातून निसटू बघते, म्हणजेच ती स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगत आहे. क्षणभरात विजेच्या कटणावरती बोट थरथरते आणि लाखविजेची संवपाखर अंगाअंगातून उठतात म्हणजे कवयित्रीला भावनेचा उद्रेक होतो आहे. मन द्विधा अवस्थेत आहे, असे दिसून येते. मनातील विचाराच्या वादळांमुळे ती असह्य होऊन हात चौकटीवर टेकते आणि आतील चाहूल ऐकते, ज्यामुळे तिचे डोळे खिळतात, म्हणजेच ती अंतर्मुख होते. कवयित्री दरवाज्यातील उंबरठ्यावर उभी राहते. मन. दाराआतील डोळ्यांवर लक्ष देते म्हणजेच (हृदयाच्या) हृदयरूपी दाराच्या उंबरट्यावर उभे राहून अंतर्मनातील अव्यक्त भावनांचा अनुभव येते. कवितेमध्ये यत्त अर्थपूर्ण आशयास दरवाजाच्या बंद फळ्या असा अलंकारिक वाक्य प्रयोग वापरला आहे. यांचदरम्यान अव्यक्त भावना म्हणजेच बंदी वासाची जाणिव करवून घेते.

मोर पिसाऱ्यासारखे झगमगणारे क्षण डोळ्यास समोर येतात, पण ते क्षणभरच टिकतात. जिथे सर्व वाटा संपतात आणि अनोळखी वळणे सुरु होतात, अशा गोंधळाच्या ठिकाणी कवियत्री स्वत:ला हरवलेली आणि दिशाहीन अनुभवते. उन्हात चमकणाऱ्या कवेच्या करणी - सारखे तिचे आयुष्य केवळ मृगजळ ठरते. अनोळखीशा ठिकाणी असंख्य वाटा आणि डोळे पाहते, म्हणजे ती जीवनाच्या अनिश्चिततेचा अनुभव घेते. आसमान उगात तिचे मन उसटसुसट तडफडते. आणि उद्या कधी मी...इथे कशी मी, या प्रश्नातून तिची हलकसता आणि अस्तित्वाचा संघर्ष स्पष्ट होतो. कवितेचा शेवट अतिशय विचारपूर्वक आहे. "कवितेच्या करणीत उन्हाच्या" या प्रतिमेतून (कविने) कवयित्रीने जीवनाचे सत्य मांडले आहे.

PAGE NO.:
DATE: / /

कवयित्रीने प्रतिक्षा, अस्वस्थता; उत्कंठा आणि भास, क्षणभंगुरता आणि गोंधळ यासेच तडफड आणि वास्तव यांचे वर्णन वेगवेगळ्या प्रतिमांद्वारे उत्कृष्टरित्या केले आहे. आयुष्य अनेकदा केवळ भासांच्या मागे धावण्यात खर्ची होते. शेवटी उरणारी मनाची तडफड आणि वैफल्य मांडून ही कठीण कविता वाचकांच्या मनावर एक खोलवर परिणाम सोडून जाते. ही कविता केवळ एका स्त्रीची व्यथा आणि तिच्या मानवी जीवनातील चिरंतन संघर्षाचे प्रतिबिंब आहे.

समारोप-

'मृगजळ' या कवितेत इंदिरा संत यांनी स्त्री मनातील अतृप्त ओढ, प्रेमाची निराशा, भास आणि वास्तव यांतील धूसर रेषा यांचे अत्यंत तरल शब्दांत वर्णन केले आहे. प्रेम कसे मृगजळासारखे हातातून निसटून जाते, याची तीव्र जाणिव होते. असताना निर्णयाच्या क्षणात अडकलेले स्त्रीमन, आत्मशोधाची भीती, भावनिक अस्वस्थता आणि व्याकुळता इ. बाबी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous)
ESTD JUNE 1964

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# ...NAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Subject Wise Student Blank Marks Entry

...on: NEP 2.0 MAR - APR 2026

...am: B.A.

...andard: B.A. - FY

Semester: SEM - II

Print Date : 30-03-2026

Subject: SAHITYARANG -II (2DSC01MAR21)

Sub-Subject: CIE

Max Marks: 10

Page No :Page 1 of 1

| SrNo | PRN | SeatNo | RollNo | Mob. No | StudentName | Marks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | A202506388 | 337002 | 4338 | 8888081079 | SALVI TANISHKA SANDEEP | 10 |
| 2 | A202506683 | 337003 | 4059 | 9322307277 | GAWADE SWAMINI BANDU | 9 |
| 3 | A202506642 | 337004 | 4023 | 9527073875 | BIRANJE RUTUJA ANIL | 10 |
| 4 | A202506500 | 337007 | 4132 | 8432925050 | KHANDEKAR VARUNA SHASHIKANT | 9 |
| 5 | A202506595 | 337008 | 4212 | 9156485969 | PATIL SEJAL SAMPAT | 8 |
| 6 | A202506453 | 337009 | 4305 | 8847723611 | YADAV ASMITA CHANDRAKANT | 10 |
| 7 | A202506579 | 337012 | 4207 | 7249352271 | PATIL SALONI YUVRAJ | 10 |
| 8 | A202506473 | 337021 | 4107 | 9529168071 | KAMBLE PRACHI MARUTI | 10 |
| 9 | A202506725 | 337022 | 4233 | 9421636535 | PRABHU SANSKRUTI SHIVAJI | 9 |
| 10 | A202506620 | 337023 | 4002 | 9975567363 | ALASE ASMITA KUMAR | 10 |
| 11 | A202506639 | 337024 | 4021 | 7588171378 | BERAD SAKSHI KUMAR | 9 |
| 12 | A202506551 | 337025 | 4174 | 9623202220 | MORE CHANDANA VAIBHAV | 10 |
| 13 | A202506399 | 337026 | 4257 | 9822772672 | SAWANT ANISHA DIPAK | 9 |
| 14 | A202506691 | 337030 | 4066 | 9527950270 | GOSAVI RUTUJA SAMBHAJI | 9 |
| 15 | A202506469 | 337034 | 4104 | 9359391592 | KAMBLE GAUTAMI NANDKUMAR | 10 |
| 16 | A202506646 | 337035 | 4335 | 7666266842 | BUNE MADHURA SANDEEP | 9 |
| 17 | A202506689 | 337036 | 4064 | 9665828334 | GHUGARE ABHISHEK BHARAT | 9 |
| 18 | A202506664 | 337038 | 4042 | 8380841919 | DABHADE NAYAN NITIN | 9 |
| 19 | A202506476 | 337039 | 4110 | 7820847784 | KAMBLE SALONI SAGAR | 9 |
| 20 | A202506685 | 337040 | 4345 | 8208277020 | GHADGE SAKSHI GANESH | 8 |
| 21 | A202506678 | 337053 | 4054 | 9588683939 | DOIPHODE TEJAS SUKHADEV | 10 |
| 22 | A202506515 | 337059 | 4144 | 7756080301 | KULKARNI SARTHAK SUJAY | 8 |
| 23 | A202506724 | 337060 | 4232 | 9011140918 | POWAR YASH PRAKASH | 9 |
| 24 | A202506600 | 337068 | 4346 | 9478655114 | PATIL SIDDHI SARDAR | 9 |
| 25 | A202506460 | 337074 | 4096 | 7972710066 | KALOKHE POOJA BAJIRAO | 10 |
| 26 | A202506405 | 337075 | 4262 | 8669740496 | SHARBIDRE SANSKAR SHANKAR | 10 |
| 27 | A202506688 | 337076 | 4063 | 7038683848 | GHORPADE SACHIN RAJARAM | 10 |
| 28 | A202506503 | 337077 | 4135 | 9860512309 | KHOCHAGE SURAJ KUMAR | 9 |
| 29 | A202506541 | 337078 | 4167 | 9370959788 | MANGALE VIPUL SANJAY | 9 |
| 30 | A202506720 | 337079 | 4088 | 8446220997 | JANTRE PRAJWAL SHASHIKANT | 10 |
| 31 | A202506536 | 337086 | 4162 | 7276714903 | MALI ROHAN DATTATRAY | 9 |
| 32 | A202506490 | 337088 | 4123 | 9665389241 | KASABEKAR PARTH SANJAY | 10 |
| 33 | A202506702 | 337089 | 4072 | 7558349299 | INGALE URF JOGI MAYURI PREMNATH | 10 |
| 34 | A202506633 | 337090 | 4015 | 9595472386 | BALNAIK PRANAV PRABHAKAR | 8 |
| 35 | A202506649 | 337091 | 4030 | 7385685017 | CHANDANSHIVE HARSHAD SAMADHAN | 9 |
| 36 | A202506718 | 337094 | 4086 | 9632822066 | JAMADAR ARSLAAN RAJDIL | 9 |
| 37 | A202506648 | 337099 | 4028 | 9322100413 | CHANDANE PRATIK NITIN | 10 |
| 38 | A202506458 | 337105 | 4094 | 8999138353 | KALADAGI NILUFAR BABUSAB | 10 |
| 39 | A202506569 | 337114 | 4187 | 9022013949 | PAKHALI MAHAMADSAD FARUK | 8 |
| 40 | A202506559 | 337122 | 4180 | 9673926346 | MULLANI ASIYA SIKANDAR | 10 |
| 41 | A202506710 | 337124 | 4329 | 7385219181 | JADHAV SANCHITA PRAKASH | 9 |
| 42 | A202506583 | 337128 | 4192 | 7887908211 | PATIL ABHIJIT ANIL | 10 |
| 43 | A202506425 | 337129 | 4282 | 7822904898 | SHINGE PRACHI SAGAR | 10 |
| 44 | A202506680 | 337130 | 4056 | 8080111417 | GADAVE APURVA SHARAD | 9 |
| 45 | A202506522 | 337131 | 4149 | 9579605894 | LANDAGE ANIL PRAKASH | 10 |
| 46 | A202506589 | 337132 | 4197 | 7499644935 | PATIL BHAKTI PRAVIN | 10 |
| 47 | A202506546 | 337133 | 4172 | 9075512504 | MITHALKAR RAJU RAM | 10 |
| 48 | A202506393 | 337142 | 4285 | 9309928310 | SARNAIK YOGESH SHIVAJI | 10 |
| 49 | A202506576 | 337148 | 4204 | 9371850901 | PATIL PRIYANKA AJIT | 10 |
| 50 | A202506665 | 337153 | 4354 | 8308603365 | DALAVI ABHISHEK PRALHAD | 8 |
| 51 | A202506441 | 337155 | 4297 | 9370924471 | ULAPE GURUPRASAD BABURAO | 8 |
| 52 | A202506386 | 337157 | 4249 | 8999064042 | SALOKHE SHUBHAM RAMNATH | 9 |

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# ...ANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Subject Wise Student Blank Marks Entry

...on: NEP 2.0 MAR - APR 2026

...am: B.A.

...ndard: B.A. - FY

Semester: SEM - II

Print Date : 30-03-2026

Subject: SAHITYARANG -II (2DSC01MAR21)

Sub-Subject: CIE

Max Marks: 10

Page No :Page 1 of 1

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 53 | A202506539 | 337161 | 4165 | 7875707991 | MANE SHIVANI BALVANT | 9 |
| 54 | A202506563 | 337166 | 4349 | 8888060646 | NAIDU KRUSHNA ANIL | 8 |
| 55 | A202506461 | 337167 | 4101 | 9673499918 | KAMBLE ANUSHKA ANIL | 10 |
| 56 | A202506442 | 337173 | 4298 | 8329959565 | VADGAONKAR DIPALI UMESH | 10 |
| 57 | A202506387 | 337185 | 4328 | 9112032165 | SALUNKHE DINESH GANPATI | 10 |
| 58 | A202506407 | 337187 | 4264 | 9637640042 | SHELAKE MRUNAL DINESH | 10 |
| 59 | A202506611 | 337190 | 4225 | 9561927762 | PAWAR PRANAV PRAKASH | 8 |
| 60 | A202506542 | 337191 | 4168 | 7058418897 | MENIKERI YOGESH UDAPPA | 8 |
| 61 | A202506426 | 337197 | 4279 | 9579553737 | SHINDE SATEJ NAGESH | 10 |
| 62 | A202506655 | 337199 | 4032 | 9112711123 | CHAVAN DIKSHA BABASO | 10 |
| 63 | A202507532 | 337200 | 4360 | 9689937737 | MORE DATTA PANDHARI | 10 |
| 64 | A202506421 | 337208 | 4277 | 9322642529 | SHINDE SALONI NAGESH | 10 |

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित**

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

# मराठी विभाग

**२०२५ – २६**

**बी. ए. भाग – ३,( मेजर ) सत्र क्र. ५**

**अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ( १० गुण )**

**गृहपाठ (Home Assignment)**

---

## सूचना

दिनांक : ०३/०९/२०२५

**बी. ए. भाग – ३ मेजर** मराठी विषयाच्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, खाली दिलेल्या प्रश्नांच्या आधारे गृहपाठ स्वतःच्या आखीव कागदावर लिहून दिनांक **१५ सप्टेंबर २०२५ ,** पर्यंत मराठी विभाग (**रूम नं ३०७**) मध्ये जमा करावेत.

**साहित्यशास्त्र -I – (DSC -VII )**

१. पौर्वात्य आणि पाश्चात्य काव्यलक्षणांचे विश्लेषण करा.

**भाषाविज्ञान आणि मराठी भाषा- I – (DSC -VIII )**

१. मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी सविस्तर लिहा.

**मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते संत तुकाराम)-I– (DSC -IX)**

१. महानुभवांच्या साती ग्रंथाविषयी विवेचन करा.

**एका वाङ्मयप्रकारचा अभ्यास – कादंबरी –(DSE -I )**

१. कृष्णात खोत यांच्या 'रिंगाण' या कादंबरीचे कथानक लिहा.

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर**

**विभागप्रमुख**
**मराठी विभाग,**
**विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.**
**(अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

09/10

DATE

PAGE NO. 1

बी.ए. भाग-३ [मेजर] सत्र क्र.५.

नाव :- दिपाली निशिकांत कांबळे.

रोल नं :- 4837

विषय :- साहित्यशास्त्र -I [DSC - VIII].

* साहित्यशास्त्र -I (DSC-VIII) *

1] पौर्वात्य आणि पाश्चात्य काव्यलक्षणांचे विश्लेषण करा.

प्रस्तावना :—

पाश्चात्य काव्यशास्त्रांनी 'सौंदर्य' हेच काव्याचे प्राणतत्व मानून काव्याच्या व्याख्या म्हणजेच काव्याची लक्षणे सांगितली आहेत. काव्यात भावनेबरोबरच भावना आविष्काराला खरे महत्त्व आहे, यावर पाश्चात्य अभ्यासकांनी भर दिलेला असतो. या पाश्चात्य अभ्यासकांनी मांडलेल्या काव्यांच्या लक्षणांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

1] वर्डस्वर्थ :—

वर्डस्वर्थ या पाश्चात्य अभ्यासकाने काव्याची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, 'उत्कट भावनेचा उत्स्फुर्त उद्रेक म्हणजे काव्य होय.' वर्डस्वर्थने आपल्याला व्याख्येत भावनेला महत्व दिला आहे. भावना आविष्काराशिवाय श्रेष्ठ प्रतीचे साहित्य निर्माण होत नाही. असे वर्डस्वर्थचे म्हणणे आहे. उदा., संत तुकाराम यांचे अभंग भावनाविष्कारातूनच जन्माला आले आहेत. असे म्हणता येईल. कविता हा वाङ्मय प्रकार तर उत्स्फूर्तता आणि भावना करत यावरच अवलंबून आहे. असे म्हणता येईल.

२) मॅथ्यू अर्नोल्ड :-
मॅथ्यू अर्नोल्ड या पाश्चत्य अभ्यासकाने काव्याचे लक्षण सांगतात असे म्हटले आहे की, साहित्य हे जीवनावरचे भाष्य असते. तसेच मानवी शब्दशक्तीचा अत्यंत निर्दोष आणि आल्हाददायक उद्गार म्हणजे काव्य होय, असे मॅथ्यू अर्नोल्ड म्हणतो. या व्याख्येतून अर्नोल्डने साहित्याच्या आंतरबाह्य स्वरूपावर तसेच काव्याचा रसिक मनांवर होणारा परिणाम यावर प्रकाश टाकलेला आहे. साहित्यिक साहित्यातून त्याने समाजात, जीवनात घेतलेले अनुभव मांडत असतो. एकप्रकारे ते जीवनभाष्याचे असते. असे मॅथ्यू अर्नोल्ड म्हणतो.

३) कार्लाईल :-
कार्लाईल या पाश्चात्य अभ्यासकाने हे काव्याची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, 'संगीतमय विचार म्हणजे काव्य होय. पौर्वात्य अभ्यासक जगन्नाथ यांनी केलेल्या व्याख्येशी साम्य असणारी व्याख्या कार्लाईल यांनी केली आहे. संगीतमय या शब्दामध्ये यांनी केली आहे. संगीतमय या शब्दामध्ये कार्लाईलला ताल, सुर, लयबद्धता, नादमयता, छंदबद्धता हे घटक अभिप्रेत आहेत. कविता हे साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट असून साहित्यामधून अशी संगीतमय विचारांची देवाणघेवाण येते, असे कार्लाईल चे म्हणणे आहे.

४) कोलरीज :-
कोलरीज या पाश्चात्य विचारवंताने काव्याची व्याख्या करताना उत्तम शब्दांची रचना यावर भर दिला आहे. तो म्हणतो की, उत्तम शब्दांची उत्तम मांडणी म्हणजे काव्य होय. साहित्य निर्माण होण्यासाठी भावना आणि भावनेची उत्स्फूर्तता महत्त्वाची

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)



आहे. त्याचबरोबर शब्दांची मांडणी सुद्धा महत्वाची असते सुद्धा आहे. असे कोलरीज म्हणतो. उत्तम शब्दांच्या साहाय्याने केलेली मांडणी साहित्याला वेगळ्या उंचीवर घेऊन जाते. असे कोलरीजचे म्हणणे आहे. संत ज्ञानेश्वरांचे ओव्या, अभंग हे उत्तम मांडणीचा नमुना आहे असे म्हणता येईल.

5] हेजलिट :-

हेजलिट या पाश्चात्य काव्य शास्त्रज्ञाने काव्याची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, कल्पनाप्रधान आणि भावनप्रधान शब्दांची मांडणी किंवा भाषा म्हणजे काव्य होय. हेजलिट आपल्या व्याख्येमध्ये कल्पनाप्रधानता आणि भावनप्रधानता या घटकांना महत्व दिले आहे. साहित्याची निर्मिती ही भावनेशिवाय होऊच शकत नाही. परंतु त्यासाठी कल्पना प्रधानता सुद्धा गरजेची असते असे हेजलिट म्हणतो.

6] एडगर ॲलन पो :-

एडगर ने काव्याचे लक्षण सांगताना लयबद्धता आणि सौंदर्य या घटकांना महत्वाचे स्थान दिले आहे. एडगर काव्याची व्याख्या करताना म्हणतो. की, 'सौंदर्याची लयबद्ध निर्मिती म्हणजे काव्य होय'. साहित्याची निर्मिती होत असताना भावना शब्दांची मांडणी यांच्याबरोबर सौंदर्यबद्दता आणि लयबद्दता ही घटक महत्वाचे असतात. असे एडगरचे म्हणणे आहे. निसर्गकविता या जन्म या सौंदर्य दृष्टीमुळे झाला. असे एडगर चे म्हणणे आहे.

समारोप :-

पौर्वात्य अभ्यासकांप्रमाणेच काही पाश्चात्य अभ्यासकांनी काव्याची लक्षणे म्हणजेच काव्याच्या व्याख्या सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या सर्व व्याख्या साहित्याची निर्मिती प्रक्रिया आणि साहित्याची वैशिष्ट्ये सांगणाऱ्या आहेत. पाश्चात्य अभ्यासकांनी आपल्या व्याख्यांमध्ये भावना, कल्पनाप्रधानता, लयबध्दता, अनुभवपर, उत्स्फूर्तता या घटकांना महत्त्व दिले आहे. या सर्व व्याख्या साहित्याची निर्मिती प्रक्रिया उलगडणाऱ्या आहेत असे मला वाटते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Subject Wise Student Blank Marks Entry

**Session:** NEP 1.0 OCT - NOV 2025
**Stream:** B.A.
**Standard:** B.A. - TY
**Semester:** SEM - V
**Print Date :** 13-10-2025

**Subject:** SAHITYASHASTRA - I (DSC01MAR51)
**Sub-Subject:** CIE
**Max Marks:** 10
**Page No :**Page 1 of 1

| SrNo | PRN | SeatNo | GRNos | RollNo | Mob. No | StudentName | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2023014319 | 482014 | 3007510 | 4846 | 9028979660 | KHOT SUSHANT SHITAL | 9 |
| 2 | 2023014300 | 482013 | 3007233 | 4927 | 9112307473 | ZADBUKE GANESH BALAJI | 8 |
| 3 | 2023014217 | 482027 | 3007071 | 4875 | 9146804834 | PATIL SAMMED DHANYKUMAR | 9 |
| 4 | 2023014103 | 482041 | 3010023 | 4837 | 7218938114 | KAMBLE DIPALI NISHIKANT | 9 |
| 5 | 2023014062 | 482034 | 3007899 | 4517 | 7020608799 | GENDE SUJAL RAHUL | 9 |
| 6 | 2023014114 | 482079 | 3007502 | 4841 | 8600234064 | KAMBLE SAHIL NARESH | 9 |
| 7 | 2023014106 | 482075 | 3007892 | 4839 | 7030568050 | KAMBLE KARAN VIKAS | 9 |
| 8 | 2023014293 | 482261 | 3009698 | 4923 | 7498064642 | VALVEKAR AMAR GAJANAN | 8 |
| 9 | | | | 4884 | 7083743400 | CHOUGALE RENUKA SANTOSH | 9 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR • (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित**

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)**

**मराठी विभाग**

**बी. ए. भाग – २ सत्र - तीन**

**अंतर्गत मूल्यमापन परीक्षा (१० गुण)**

**गृहपाठ (Home Assignment)**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

---

## सूचना

दिनांक : ०६/०९/२०२५

बी. ए. भाग – २ मराठी (मेजर) विषयाच्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, खाली दिलेल्या प्रश्नांच्या आधारे गृहपाठ स्वतःच्या आखीव तावावर लिहून दिनांक **१५ सप्टेंबर, २०२५** पर्यंत **रूम नं. ३०७, मराठी विभागमध्ये** जमा करावयाचे आहेत.

### पेपर ३ - कथारंग

**गृहपाठासाठीचे प्रश्न (कोणताही एक प्रश्न सोडवा)**

१. 'होरपळ' कथेमध्ये दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण आसाराम लोमटे यांनी कसे केले आहे?

२. 'पावसात सूर्य शोधणाऱ्या मुलीची गोष्ट' या कथेतून स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या स्त्रीचे चित्रण लेखिका नीरजा यांनी कसे केले आहे?

### पेपर ४ - कवितागंध

**गृहपाठासाठीचे प्रश्न (कोणताही एक प्रश्न सोडवा)**

१. भा. रा. तांबे यांच्या 'डोळे हे जुलमी गडे' आणि 'प्रणयप्रभा' या कवितांचा आशय स्पष्ट करा.

२. इंदिरा संतांच्या 'शेला' आणि 'नको नको रे पावसा' या कवितांचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर**

विभागप्रमुख
मराठी विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

मधाळे उषा दादासोहेब
रोल नं. 4504

सी - 3

पेपर ३ - कथारंग

सत्र - 3

09/10

१. 'होरपळ' कथेमध्ये दलित - सवर्ण संघर्षाचे चित्रण आसाराम लोमटे यांनी कसे केले आहे ?

→ 'होरपळ' ही आसाराम लोमटे यांच्या 'इडा पीडा टळो' या कथासंग्रहातील दीर्घकथा आहे. हा कथासंग्रह शब्द पब्लीकेशन मुंबई यांनी २००६ साली प्रकाशीत केला. 'होरपळ' या कथेतून गावच्या राजकारणात सामान्य माणसांची होणारी होरपळ कशी असते याचे वास्तव दर्शन घडविले आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील छोट्या खेड्यातील दलित - सवर्ण संघर्षाचे चित्रण आसाराम लोमटे यांनी केले आहे. दुष्काळ, घाणेरडे राजकारण अशा अनेक मुद्दयांच्या आधारे कथेचा विचार करता येईल.

कथेच्या सुरुवातीला पावसाचे वातावरण कथाकाराने उभे केले आहे. मृग नक्षत्र, श्रावण महिन्यातील पाऊस असे पावसाच्या ऋतूचे वर्णन कथेत येते. नाना मालधुरे हा गावातील राजकारणी आणि जमीनदार, सरपंच तरुण राजकारणी गिरीधर सुरवसे अशी काही महत्वाची पात्रे कथेत येतात.

नाना. माळधूरे आपल्या वाड्याच्या शेजारी असलेल्या गायवाड्यात जनावरांसाठी दावी वळून घेतो आहे. त्यादिवशी नाना सर्व सालगड्यांना लवकरच घरी पाठवतो. बन्सी गावच्या गड्याला रात्रीच्या मुक्कामाला आले नाही तर चालेल असे सांगतो. बन्सीला काहीतरी शंका आली पण आपणास लवकर झोपायला मिळणार म्हणून तो खुश असतो.

निरोप दिल्याप्रमाणे घरी जेवण वेळ टळून गेल्यानंतर पुन्हा नानाच्या गायवाड्यात येतो. सोबत त्याचे आणखी तीन - चार साथीदार असतात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)



गावच्या वेशीवर बाबासाहेबांचा पुतळा उभा करण्याचे बौध्दवाड्यातील लोकांनी ठरवलेले असते. त्या गोष्टीला नानाची साथ असते. पुतळा उभा करण्याची किती तयारी झाली ? याविषयी विचारणा करण्यासाठी नानांनी हारीला आणि साधोदाशंना बोलविलेले असते. नाना सरपंच असताना पुतळ्या-साठी जागा देण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. बौध्दमंडळीकडून पुतळ्यासाठी अठरा हजार रूपये जमा झाले होते. सिमेंटची पोती देतो असेही नानाने सांगितलेले असते. परंतु या पाठीमागे नाना आहे हे कोणाला कळू देऊ नका असे नाना त्यांच्याकडून ठामपणे वदवून घेतो.

आपले सरपंचपद गेल्याने नानाला वाईट वाटते. त्यामुळे त्या सरपंचाच्या आणि सदस्यांचा माज उतरण्यासाठी नानाने ही खेळी केली होती. पुतळा उभारू नये यासाठी सरपंचाला डिवचा-यच आणि त्यामध्ये राजकारणाची पोळी आपून भाजायची असे नानाचे नियोजन असते.

पुतळा बसवल्याने अनेक प्रश्न निर्माण होतील म्हणून पुतळा हलवू दयायचा नाही असे ठरले होते. दरम्यान बुध्दवाड्याजवळ निळा झेंडा उभा केला होता. गिरिधर सरपंच अस्वस्थ असतो. एकीकडे आंबेडकरांचा पुतळा उभा रहायच म्हणतात. नानासाहेबांची फूस असते. यातून मार्ग काढण्यासाठी गिरीधर आमदार सुदरराव शिरलाठ यांची भेट घेण्यासाठी गेले.

पोळ्याच्या दिवशी गर्दी जमते. बैल, गाई, गुराख्यांचे आवाज सगळीकडे ऐकू येतात. पाटील वेशीत येतात. पाटलांनी वेशीतलं तोरण तोडलं. बैल उधळतात. त्या गोंधळात झेंडा खाली येतो. सुंदररावाने झेंडा वडत असेच सर्वांनी वातावरण तयार केले. सर्वांनीच झेंडा उचकटून आधी लढाई जिंकली होती.

सामान्य माणूस राजकारणाचा बळी -

गावच्या वेशीवर पुतळा उभा करण्याचे ठरल्यापासून कोणालाच रानातील काम झेपेना झाले होती. पैसा पुतळ्याच्या वर्गणीसाठी दिला होता. पावसाळ्याचे दोन महिने बसून खाल्ले पण आता कामाची गरज होती.

तुम्हाला काय कामाची गरज बाबा? पुतळ्यासाठी अर्ध्या रात्रीत अठरा हजार जमा करणारी माणसं तुम्ही. थोडिबा नानाकडे काम मागण्यासाठी गेला पण नानांनेही काम नसल्याचे सांगितले. बौद्धवाड्यातील लोकांचा कोंडमारा होत होता.

नानासाहेब दोन्हीकडच्या लोकांची झुंज लावून स्वत:साठी राजकारणाची पोळी भाजण्याचे काम करत. बौद्धवाड्यातील कार्यकर्त्यांच्या ध्यानात आले होते. पण हरीने लाजूनही नानासाहेबांची संगत सोडली नव्हती. इकडे नासधूस झाली म्हणून फिर्याद द्यायला हरीला नानासाहेबांनी सांगितले.

समंजसपणा -

बुद्धवाड्यातल्या ज्येष्ठांना पुतळा नको असतो. पुतळा बांधल्यावर गावातले लोक आणखी डाव धरतील असं त्यांना वाटते. गावकऱ्यांवरच आपलं पोट आहे याची जाणीव करून देतात. आंबेडकरांचा पुतळा उभारू द्यायचा नाही या एका विचाराने गावातील सर्व पक्ष एकत्र होतात. पुतळ्याचीच हौस असल तर बुद्धवाड्यातच बांधा की म्हणाव असं रामा सुतार बोलतो. सरपंच गिरीधरला लवकर निर्णय घे असं सर्वजण सांगतात. पण गिरीधर राजकारणात नवीन होता. सरपंचपदाची जबाबदारी होती. त्यामुळे तो आमदाराला विचारून येतो असं म्हणतो. आमदार शिरसाठांच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त सर्व गावातील कार्यकर्त्यांना शिरसाठांनी गंगाखेडला बोलविले होते. वाढदिवसाच्च सर्वांची जेवण झालेत. गर्दी कमी झाल्यावर गिरिधर आणि त्याच्या कार्यकर्त्यांना सांगितले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



गावात पुरावा ठेवायचा नाही. पोलिसांना काय सांगायचं सांगतो. प्रकरण परभणी पर्यंत जाणार नाही इथच निपटून टाकू. असे सांगून आमदाराने सर्वांच्यात विश्वास निर्माण केला. पुतळ्याची जागा साफ झाली होती. काम झाल्यावर गिरीधरने सर्वांना आपल्याला घरात जायला सांगितले.

बुधवाड्यातल्या माणसांनी हे सर्व पाहिलं होतं. तक्रार द्यायला पाहिजे असा विचार होतो. हारीला काय सुचत नव्हत. तो म्हणाला पोलीस तरी काय करणार ?

रात्री बारानंतर गावात पोलीस आले. गावातील लोकांकडून चौकशी सुरू केली. पण कोणी माहीत नसल्याचे सांगत होते. पोलीस सरपंचाच्या घरी आले. सरपंचाला विचारले. गिरीधरने सांगितले मी आज कृषी विद्यापीठात शेतकरी मेळाव्यासाठी होतो. मला काही माहीत नाही. अशी उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलीस पाटलांनी तर जागेवरच चबुतराच नव्हता असे सांगितले. बुधवाड्यात येऊन हारीला पोलिसांनी विचारले तर हारीने गावातील लोकांनी चबुतरा उखळल्याचे सांगितले. पण हारीजवळ पुरावा नव्हता. पोलीसांना कोणताही पुरावा सापडला नाही. पोलीस निघून गेले.

बुधवाड्यावर अवकळा पसरल्यासारखे झाले होते. त्यांची उपासमार चालली होती. कोणीही त्यांना मदत करू शकत नव्हत. कामाचा काहीतरी बनाव लागेल असा सर्वांचाच विचार होतो. गावात त्यांना काम मिळू शकत नव्हते. सर्वांनी गाव सोडायचा निर्णय घेतला. सामानाची आवराआवर करून बुधवाड्यातील सर्व रात्रीतच गाव सोडतात.

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Subject Wise Student Blank Marks Entry

**Session:** NEP 2.0 OCT - NOV 2025

**Subject:** KATHARANG (2DSC01MAR31)

**Stream:** B.A.

**Standard:** B.A. - SY

**Sub-Subject:** CIE

**Max Marks:** 10

**Semester:** SEM - III

**Page No** :Page 1 of 1

**Print Date** : 01-12-2025

| SrNo | PRN | SeatNo | GRNos | RollNo | Mob. No | StudentName | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 409035 | 3017889 | 4511 | 9096675800 | KATKAR SHRAVAN MARUTI | 8 |
| 2 | 2024014074 | 409060 | 3011946 | 4500 | 9096765505 | KADAM ATHRAV KRUSHNAT | 9 |
| 3 | 2024014264 | 409065 | 3014669 | 4510 | 9130657494 | THORVAT SANIKA ANIL | 9 |
| 4 | 2024014014 | 409066 | 3013027 | 4502 | 9766262825 | BEDAGE KOMAL VISHWAS | 9 |
| 5 | 2024014192 | 409067 | 3011952 | 4499 | 8329106881 | PATIL ANUSH AJIT | 9 |
| 6 | 2024014178 | 409073 | 3011980 | 4508 | 9307252007 | NAIK PRADNYA TANAJI | 8 |
| 7 | 2024014134 | 409074 | 3013083 | 4503 | 9604678364 | LAD SANCHITA UDAY | 10 |
| 8 | 2024014141 | 409076 | 3012293 | 4509 | 8007324292 | LOKHANDE PRATHAMESH PRASHANT | 9 |
| 9 | | 409079 | 3019959 | 4507 | 9511971005 | POWAR RITESH RAMCHANDRA | 9 |
| 10 | 2024014044 | 409089 | 3014729 | 4501 | 7219110947 | GAIKWAD ROHIT SANGRAM | 8 |
| 11 | 2024014148 | 409111 | 3012766 | 4498 | 7083360875 | MAKANDAR ABBASALI AKBAR | 8 |
| 12 | 2024014145 | 409130 | 3013824 | 4504 | 9921510783 | MADHALE USHA DADASAHEB | 9 |
| 13 | | | | | | MISAL MAYURESH BARCHI | 7 |
| 14 | | | | | | PARIT ANUJA ASHOK | 7 |
| 15 | | | | | | YADAV NISHANT ASHOK | 7 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Empowered Autonomous)